| | |
|---|---|
| MHTH180007602026 | **इ.कि.फौ.अर्ज.क्र. ४३/२०२६**<br>बुधाजी म्हारसे वि. सरकार |

## निशाणी ०१ वरील आदेश

(२९.०५.२०२६)

प्रस्तुतचा अर्ज मुरबाड पोलीस स्टेशन गुन्हा क्र.२७/२०२६ मधील अर्जदार बुधाजी कृष्णा म्हारसे यांनी ३०,०००/- रूपये किमतीची एक सोन्याची चैन ३ तोळे वजनाची व ५,०००/- रूपये किमतीची सोन्याची अंगठी ५ ग्रॅम वजनाची (येथून पुढे जप्त मुद्देमाल असे संबोधण्यात येईल) चा अंतरिम ताबा मिळण्यासाठी दाखल केला आहे.

**२.** सहा.सरकारी वकील यांनी म्हणणे सादर केले नाही. तपासी अधिकारी यांनी नि.०५ वर म्हणणे दाखल केले आहे. अर्जदारातर्फे वकील श्री. तानाजी कडव यांचा युक्तिवाद ऐकला.

**३.** अर्जदाराने कथन केले की, वरील मुद्देमाल गु.र.क्र. २७/२०२६ मध्ये पोलिसांनी जप्त केलेला आहे. सदर दागिने हे अर्जदार यांचे मालकीचे आहेत. हे दाखविण्याकरीता त्यांनी प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. केसचा निकाल लागेपर्यंत तीत कुठलाही बदल करणार नाही. ज्या अटी व शर्ती लादण्यात येतील, त्या पाळण्यास ती तयार आहे. अर्ज मंजूर करण्याची विनंती त्यांनी केली.

४. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे स्पष्ट होते की, अर्जदाराने मागीतलेला मुद्देमाल पोलिसांनी जप्त केलेला आहे. तपासी अधिकारी यांनी त्यांचे म्हणणे निशाणी क्र. ०५ वर दाखल केलेले आहे. त्यांनी पुढील मुद्देमाल अर्जदारास देण्यास कोणतीही हरकत नसल्याचे सांगितले, **३५,०००/- रूपये किमतीची सु एक पिवळसर धातुची असलेली लगडी व गोळा (रवा) ३४.५३० ग्रॅम वजनाची.**

**५.** जप्त मुद्देमालाचा अंतरिम ताबा अर्जदाराने मागितलेला आहे. अर्जदाराने सदर मुद्देमालाच्या मालकीबाबत पावत्या न्यायालयात दाखल केलेल्या आहेत. मुद्देमाल अर्जदारास देण्यास तपासि अधिकारी यांनी हरकत घेतलेली नाही. त्यामुळे अटी व शर्ती लादता येवून मुद्देमालाचा अंतरिम ताबा अर्जदारास देणे उचित ठरणार आहे. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करतो,

**<u>आदेश</u>**

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. मुरबाड पो.स्टे. गुन्हा क्र.२७/२०२६ मधील तपासि अधिकारी यांना आदेशीत करण्यात येते की, त्यांनी निशाणी क्र. ०५ मध्ये दिलेल्या म्हणण्याप्रमाणे अर्जदाराचा पुढीलप्रमाणे जप्त मुद्देमाल, **३५,०००/- रूपये किमतीची सु एक पिवळसर धातुची असलेली लगडी व गोळा (रवा) ३४.५३० ग्रॅम वजनाची.** या जप्त मुद्देमाला चा अंतरिम ताबा रू.३५,०००/-च्या बंधपत्रावर अर्जदारास द्यावा.

३. अर्जदार यांनी खटल्याचा निकाल लागेपावेतो जप्त मुद्देमाल कोणासही विक्री करू नये किंवा हस्तांतर करू नये.

४. न्यायालय आदेश करेल त्यावेळेस जप्त मुद्देमाल न्यायालयासमोर हजर करावा.

५. जप्त मुद्देमालाचा ताबा अर्जदारास देतेवेळी तपासि अधिकारी यांनी दोन रंगीत छायाचित्र काढावे व पंचनामा करावा.

६. छायाचित्राचा खर्च अर्जदाराने सोसावा.

VARPE GOVIND SITARAM
Digitally signed by VARPE GOVIND SITARAM
Date: 2026.05.29 17:13:59 +0530

मुरबाड
दिनांक २९.०५.२०२६

**(गोविंद एस. वर्पे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
मुरबाड.